# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम.फिल.पदवीसाठी 'कथाकार विलास सिंदगीकर' या विषयावरील प्रबंधिका सादर करताना मला मनस्वी आनंद होत आहे. प्रस्तुत संशोधन कार्यात मला ज्यांचे मौलिक सहकार्य, मार्गदर्शन लाभले. ज्यांनी संशोधनाविषयी सातत्याने आणि सहृदयतेने विचारपूस केली, त्या सर्वांविषयी ऋण व्यक्त करणे हे माझे कर्तव्य समजते.

प्रस्तुत प्रबंधिकेसाठी मार्गदर्शक म्हणून शिवाजी विद्यापीठातील मराठी विभागाचे प्राध्यापक व डॉ.बाबासाहेब आंबेडकर संशोधन व विकास केंद्र याचे संचालक आदरणीय गुरूवर्य प्रा.डॉ.कृष्णा किरवले सर लाभले. त्यांनी केलेले मार्गदर्शन हे केवळ संशोधन कार्या पुरते मर्यादित नसून भावी जीवनासाठी बहुमोल असेच आहे.त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठाच्या मराठी विभागातील डॉ.विश्वनाथ शिंदे, डॉ.रवींद्र ठाकूर, डॉ.रणधीर शिंदे, हिमांशू स्मार्त सर यांनी वेळोवेळी सहकार्य केले. त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे. या प्रबंध लेखनास लेखक विलास सिंदगीकर यांच्या प्रकाशित साहित्यकृती, परीक्षणे उपलब्ध करून देऊन सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांची ऋणी आहे.

त्याचबरोबर खऱ्या अर्थाने मी जेथे घडले त्या कुटुंबाची मी ऋणी आहे. हे संशोधन कार्य करीत असताना मला वेळोवेळी प्रोत्साहन देणारे माझे मनोबल वाढविणारे माझे वडील शंकर पाटील आणि माझी आई सुनंदा पाटील यांची मी शतश: ऋणी राहीन. माझा भाऊ अमोल, तसेच बहिण अनुराधा सुर्यवंशी, माझी मावशी राजश्री सुर्यवंशी व काका भास्कर सुर्यवंशी, माझी आत्या पार्वती शिंदे, लातूरच्या आर्चना ताई व दत्ता दाजी, अनिता काकी या सर्वांच्या प्रोत्साहनामुळे हे संशोधन कार्य पूर्णत्त्वास गेले.

त्याचबरोबर शिवाजी विद्यापीठामधील बॅ.बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, पद्मश्री वसंतदादा पाटील वाचनालय कोरेगांव, या ग्रंथालयातील संदर्भ ग्रंथ त्या त्या ग्रंथपालांनी उपलब्ध करून दिल्याने मी त्यांची आभारी आहे. तसेच क.भा.पाटील महाविद्यालय

उरूण-इस्लामपूर ग्रंथालयातील ग्रंथपाल सज्जन पाटील, आयन्नुदिन मुल्ला यांचेही मोलाचे सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांची आभारी आहे.

त्याचबरोबर माझ्या संशोधनामध्ये खारीचा वाटा उचलणाऱ्या माझ्या मैत्रिणी सीमा मुसळे, वैशाली चौगुले, ज्योती माने, वनश्री सोने, स्मिता ढावरे, संगिता मोहिते, चंद्रभागा चोखा, तसेच संभाजी शिंदे डॉ. सारीपुत्र तुपेरे, डॉ. रामदास नाईकनवरे, प्रविण लोंढे तसेच मराठी विभागातील सौ. शिगावकर, सौ. स्वामी यांचेही मोलाचे सहकार्य मिळाले. या सर्वांची मी आभारी आहे.

अस्मिता शंकर पाटील